## निवडक



साळ : येथील मंदिर परिसरात हॉटमिक्स डांबरीकरण करताना कर्मचारी.

### साळ येथे हॉटमिक्स डांबरीकरण, डागडुजीस प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ९ :** साळ येथील गडे उत्सवाला थोडेसे दिवस बाकी राहिल्याने साळवासीयांना व भाविकांना सुविधा पुरविण्यासाठी डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेटये हे सुद्धा प्रयत्नरत आहेत.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार तातडीची उपाययोजना म्हणून श्री महादेव मंदिर परिसर व होळी परिसरात हॉटमिक्स डांबरीकरणाने डागडुजी करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. तसेच गावात भुमिगत वीज वाहिन्यासाठी खोदलेला रस्ता व खोदलेले खड्डे बुझवावेत अशी ग्रामस्थांनी मागणी केली होती, त्यानुसार हे खणलेले खड्डे बुझविले. साळ मधील गडे उत्सवा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी हे खड्डे बुजवून त्याठिकाणी हॉटमिक्स डांबरीकरण केले. या सोयीमुळे साळ मधील तमाम ग्रामस्थांनी आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये व सरकारी संबंधित खात्याचे आभार मानले.

---

### मांद्रे गुडीपाडवा स्वागत समितीचे स्वागताध्यक्ष मुकुंद कायसुकर

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ९ :** मांद्रे गावातील हिंदू नववर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात, दिमाखात आणि ग्रामदेवता श्री भगवती देवी मंदिराच्या प्रांगणात व्हावे, असा संकल्प केला. गावातील सर्व हिंदू नागरिकांनी एकत्र येऊन नवीन वर्ष साजरे करावे या उद्देशाने विविध सामाजिक संस्थांना, ग्रामपंचायत मंडळ, विविध देवस्थान समित्या, सांप्रदाय, महिला मंडळ, क्रिडा मंडळ आणि विद्यार्थी वर्गाला या उपक्रमात सहभागी करून घेण्याचा निर्धार संयोजक महेश वासुदेव गोडकर यांनी करण्यात आला.

त्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत स्वागत समिती तसेच विविध उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. प्रमुख समितीची यादी पुढीलप्रमाणे आहे. स्वागताध्यक्ष – मुकुंद कायसुकर, उपाध्यक्ष – सुभाष पार्सेकर, प्रसाद शहापूरकर, केशव मांद्रेकर, मंगेश नाईक. सचिव – संजय नाईक, सहसचिव – गौरेश कोरगावकर. खजिनदार – परेश सावंत. सहखजिनदार – गोविंद आसगावकर. संपर्कप्रमुख – विनायक च्यारी. सहसंपर्क प्रमुख – सुहास गावडे. गुढी पूजन व्यवस्था प्रमुख – दिनेश मयेकर. सहप्रमुख – राजन मसुरकर. गुरुदास गडेकर, निमंत्रण पत्रक प्रमुख : उद्देश पेडणेकर, नारायण सावंत, विलास गोवेकर. सजावट समिती प्रमुख – दीपेश हरमलकर. सहप्रमुख –तिर्थराज म्हामल, स्वप्निल बागकर, अर्जुन गोडकर, संकेत पुर्खे, मनोज हडफडकर, कृष्णा गोडकर, प्रचार प्रसार प्रमुख – यशवंत सावंत, प्रसाद शहापूरकर. ढोल ताशा प्रमुख – संतोष बर्डे, उप प्रमुख – चंद्रा सातोस्कर, रमाकांत कशालकर, लाडू पुर्खे, काशीराम साळगावकर. स्वागत तोरण कमानी प्रमुख – प्रवीण किनळेकर, उपप्रमुख – तुळशीदास सावंत, भगवान गडेकर, अर्जुन खर्बे. झिलू नाईक. आतशबाजी व्यवस्था प्रमुख – रवी गोवेकर, उपप्रमुख – मुकुंद गोवेकर, अरुण म्हामल, सुनील कोनाडकर, सूर्यकांत गडेकर, वासू नाईक, बाबू पुर्खे, सुनील गोडकर.

स्टेज व साऊंड सिस्टम प्रमुख – विजेश मांद्रेकर, सिद्धार्थ नाईक, दीपक म्हामल. देवस्थान संपर्क प्रमुख – सिद्धारूढ म्हामल, जगन्नाथ पार्सेकर, पांडुरंग गावडे, मनोज मोरजकर, राजेश नाईक. सुजय म्हामल. सम्राट सावंत. अल्प आहार प्रमुख – राजेश हडफडकर, प्रेमानंद म्हामल. वाहन व्यवस्था – ज्ञानेश्वर निळू गावडे. हनुमंत शेटकर, समीर साळगावकर. महिला प्रमुख – शिल्पा म्हामल. सह प्रमुख – तन्वी केरकर, विणा म्हामल. युवा प्रमुख – मितेश पार्सेकर. सह युवा प्रमुख – मनोज जोशी. सह युवा प्रमुख – विठु मसुरकर. संयोजक – महेश वासुदेव गोडकर. नववर्ष स्वागत सोहळ्याचे आयोजन रविवार ३० रोजी अत्यंत भव्य स्वरूपात होणार असून, संपूर्ण मांद्रे वासियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

---

### धुळेर म्हापसा येथे आज संगीत अकादमीचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ९ :** गणेश गुरुकुल संस्था आणि संजीवन संगीत अकादमी प्रस्तुत स्वर प्रिया अकादमी स्वर्गीय प्रियांका नार्वेकर यांच्या स्मृतीला वाहिलेली सांगित अकादमीच्या उद्घाटन सोहळा सोमवारी दि. १० रोजी संध्याकाळी ५.३० वाजता गणेश गुरुकुल सभागृह धुळेर म्हापसा यांचा उद्घाटन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे प्रा. रमेश सप्रे तर अतिथी म्हणून अनिल सामंत उपस्थित राहणार आहे, त्यानंतर गोमंत प्रतिभा हा गोमंतक पंडित जितेंद्र अभिषेकी व बा. भ. बोरकर यांच्या निवडक गीतांचा कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमात संकल्पना आणि संगीत संयोजन डॉक्टर प्रवीण गावकर यांच्या आहे यात गायिका पल्लवी पाटील आरती गावडे अश्विनी अभ्यंकर सिया पै, मधुरा नवघरे, ध्रुवी च्यारी उरवी फडतै भाग घेणार आहे यात त्यांना संगीत साथ रोहिदास परब,दत्तराज माळशी किशोर तेली आदित्य गावकर करणार आहे निवेदन मानसी वाळवे करणार आहेत.

---

### शिवोली येथील गणेश विश्वस्त मंडळाचा उद्या साप्ताहिक मंगळवार

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ९ :** शिवोली येथील श्री गणेश विश्वस्त मंडळाचा साप्ताहिक मंगळवार दिनांक ११ रोजी यजमान किशोर पोबूफेकर यांच्या तर्फे होणार आहे. त्यानिमित्त सकाळ अभिषेक दुपारी महाप्रसाद व संध्याकाळी ६ वाजता कांता गोवेकर व साथी यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

---

### कीर्ती विद्यालयतर्फे बाल मेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ९ :** कीर्ती विद्यालयतर्फे बाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात शिवोली गावातील सरकारी प्राथमिक शाळा, बामणवाडा व सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल – चोपडे, कीर्ती विद्यालय (पूर्व प्राथमिक विभाग ), कीर्ती विद्यालय (प्राथमिक विभाग) शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमात विविध खेळ व स्पर्धा, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरकारी प्राथमिक शाळा , बामणवाडा च्या शिक्षिका प्रगती चणेकर व सीमा गोसावी व सरकारी प्राथमिक शाळा, ओशेल – चोपडे च्या शिक्षिका विद्या साळगांवकर व कॅथरीन गॉडद यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पूजा वाडकर यांनी सर्वांना संबोधले.प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ देण्यात आले.तसेच शिक्षिका सौ. रेश्मा गोलतेकर यांनी बाल मेळाव्याचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. त्यानंतर अल्पोपहार घेऊन विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा आणि खेळ यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

# भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरले नाव

## न्यूझीलंडवर मिळवला ऐतिहासिक विजय | कर्णधार रोहित शर्माची वादळी खेळी

**दुबई, दि. ९ :**



भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात ३४ धावांची नाबाद खेळी खेळून टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर ठेवत राहुल नाबाद परतला. यावेळी त्याला हार्दिक पंड्याचीही साथ लाभली ज्याने १८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. किवी संघाकडून मायकेल ब्रेसवेल आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पुन्हा एकदा भारताच्या फिरकी चौकडीने आपली कामगिरी चोख बजावली. भारताच्या फिरकी विभागाने चांगली कामगिरी करत धावांवर अंकुश ठेवला आणि न्यूझीलंडला २५१ धावांवर रोखलं. रचिन रवींद्र आणि विल यंगने किवी संघाला अर्धशतकी भागीदारी रचत चांगली सुरूवात केली. पण रोहित शर्माची रणनिती आणि भारताच्या फिरकी विभागाने टीम इंडियाला सामन्यात परत आणले. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने ३७ धावा, डॅरिल मिचेलने ६३ धावा आणि ब्रेसवेलने ५३ धावांची खेळी केली.

भारताकडून कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्तीने २ विकेट्स तर रवींद्र जडेजा–मोहम्मद शमीने १–१ विकेट घेतली. रोहित शर्माने कमालीचे नेतृत्त्व करत संघाला विजय मिळवून दिला.

### रोहितने मोडले दोन माजी कर्णधारांचे विक्रम

**रोहित शर्मा भारताकडून दोन आयसीसी ट्रॉफी जिंकणारा दुसरा कर्णधार ठरला आहे. यापूर्वी रोहितच्या नेतृत्त्वाखाली भारताने २०२४ मध्ये बार्बाडोसमध्ये झालेल्या आयसीसी टी२० विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत विजेतेपद मिळवले होते. रोहितच्या आधी, एमएस धोनीने तीन आणि सौरव गांगुली व कपिल देव यांनीही भारताला प्रत्येकी एक आयसीसी स्पर्धेते विजेतेपद मिळवून दिले होते. रोहितने या सामन्यात ८३ चेंडूत ७६ धावांची शानदार खेळी करत भारताच्या विजयाचा पाया रचला.रोहितच्या या खेळीत सात चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता.**

---

### आसीसी स्पर्धांमध्ये चमकला केएल राहुल

**यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुलने भारताच्या या विजयात महत्त्वाची खेळी तर केलीच आहे. पण यापूर्वीही त्याने आयसीसी स्पर्धांच्या बाद फेरीच्या सामन्यात अनेकवेळा दमदार खेळी करत भारताला विजय मिळवून दिला आहे.**

# कलाकारांनी यशस्वी होण्यासाठी संघर्षाची तयारी ठेवा

## प्राचार्य अनिल सामंत : नटवर्य प्रभाकर पणशीकर महोत्सवाचे पेडण्यात थाटात उदघाटन

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ९ :** नाट्य क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कलाकारांनी संघर्ष करण्यास तयार असायला हवं असं प्रतिपादन गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत यांनी पेडणे येथे आयोजित केलेल्या नटवर्य प्रभाकर पणशीकर स्मृती महोत्सवाच्या उद्घाटनसमयी प्रमुख अतिथी या नात्याने बोलताना काढले.

यावेळी व्यासपीठावर पणशीकरांच्या कन्या ज्येष्ठ अभिनेत्री जान्हवी पणशीकर आणि तरंगिणी खोत, पेडण्याचे नगराध्यक्ष मनोज हरमलकर, सातेरी मंदिर जिर्णोद्धार समितीचे अध्यक्ष रामा सावळ देसाई, कलामंचाचे अध्यक्ष प्रवीण कोटकर तसेच गोवा मराठी अकादमीच्या पेडणे प्रभागाचे अध्यक्ष चंद्रकांत सांगळे उपस्थित होते. नटवर्य प्रभाकर पणशीकर कलामंच, गोवा मराठी अकादमी पेडणे प्रभाग आणि मुळभूमिका सातेरी मंदिर जिर्णोध्दार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा तीन दिवशीय महोत्सव श्री देवी भगवती मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता.

प्रत्येक नाटक हे त्या काळापूरते मर्यादित नसते. तर त्या काळापुढेही जाणारे असते. पणशीकरांची सर्वच नाटके ही आजच्या काळातही तेवढीच महत्त्वाची आहेत. नवीन नाट्यलेखकांनी आपल्या नाटकांचे वाडमयीन मूल्य काय आहे. याचेही समीक्षण करावे. नाटकामध्ये साचलेपणा येता कामा नये आणि त्या दृष्टीने नाट्यसंस्थांनी नाटक प्रवाही राहण्यासाठी नवनवीन बदल आणावेत. शब्द हा नाटकाचा प्राण आहे. त्यासाठी गोमंतकीय नाट्य कलाकारांनी स्पष्ट शब्दोच्चार, भाषाशुद्धी आणि लखलखीत संवादफेक यावर भर देणे आवश्यक आहे, असे पुढे अनिल सामंत म्हणाले.

नाटक हे कलाकार तयार करण्याची कार्यशाळा असते. रसिकांनी स्थानिक कलाकारांचे कौतुक करण्यासाठी, त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी हौशी रंगभूमीवरच्या नाटकांना आवर्जून उपस्थित राहणे आवश्यक आहे असे उदगार ज्येष्ठ अभिनेत्री जान्हवी पणशीकर यांनी काढले.

नगराध्यक्ष मनोज हरमलकर यांनी आपल्या मनोगतात महोत्सवाला शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रविण कोटकर, चंद्रकांत सांगळे, प्रशांत मांद्रेकर, नीलेश नाईक, उमेश गाड, आशिष कांबळी आणि केशव पणशीकर यांनी पाहुण्यांना पुष्पगुच्छ प्रदान केले. कार्यक्रमाची सुरवात स्वरगंधा, मांद्रेच्या कलाकारांनी प्रस्तुत केलेल्या नांदीने झाली.

संस्थेचे उपाध्यक्ष राजमोहन शेट्ये यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले तर सदस्य केशव पणशीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू बोंद्रे यांनी तर सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन सोमनाथ पार्सेकर यांनी केले. तदनंतर गंगाळदेव नाट्यमंडळ, बिद्रुबाग मांद्रे या संस्थेने प्र. के. अत्रे लिखित तो मी नव्हेच या अजरामर नाटकाचा प्रयोग सादर केला. रासिकांना स्थानिक कलाकारांचे कातुक करण्यासाठी त्याचा उत्साह वाढविण्यासाठी हौशी रंगभूमीवरच्या नाटकांना आवर्जून उपस्थित राहणे आवश्यक आहे असे उदगार ज्येष्ठ अभिनेत्री जान्हवी पणशीकर यांनी काढले.




हरमल : पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात क्रीडा मेळाव्यात सिद्धेश केसरकर यांना स्मृतिभेट देताना प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित. सोबत क्रीडा प्रशिक्षक डॉ अनिकेत केरकर व परब.

# गणपत पार्सेकर शिक्षण महाविद्यालयात वार्षिक क्रीडा दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** हरमल पंचक्रोशी शिक्षण संस्थेच्या गणपत पार्सेकर महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा दिन यशस्वीरित्या झाला.

पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर संपन्न झाला.ह्या मेळाव्यात बुद्धिबळ, टेबल टेनिस, बॅडमिंटन, टेनिकॉइट, फुटबॉल, क्रिकेट, टग ऑफ वॉर, डॉज बॉल इत्यादी विविध आंतरवर्गीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महिला दिनानिमित्त शारीरिक शिक्षण विभागाने महिलांसाठी स्वसंरक्षण तसेच झुंबा, शॉट पुट, डिस्कस थ्रो, टाय ब्रेकर, आयर्नवुमन आणि आयर्नवुमन या विषयावर सत्र आयोजित केले.

या क्रीडा मेळाव्यास प्रमुख पाहुणे उच्च शिक्षण विभागाचे सहाय्यक संचालक सिद्धेश केसरकर हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिक्षणासोबतच खेळांमध्येही सहभागी होण्यावर आणि बीएड अभ्यासक्रमानंतर शाळेत काम करण्यास सुरुवात करताना क्रीडा वृत्ती चालू ठेवण्यावर भर दिला. वास्तविक जीवनात खेळांची भूमिका आणि खेळ एखाद्याचे व्यक्तिमत्व कसे बदलू शकतात यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी साधन सुविधांचा लाभ घेऊन सजग राहावे, असे आवाहन वरद परब यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित आणि शारीरिक शिक्षण संचालक लेफ्टनंट डॉ. अनिकेत केरकर उपस्थित होते.

# सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने जिंकला आल्कॉन जीएसबी युनिटी कप

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. ९ :** सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने मडगाव रॉयल्सचा ३१ धावांनी पराभव करत आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धा जिंकली. मेगा स्ट्रायकर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ गडी गमावून १७२ धावा केल्या. प्रत्युत्तर देताना मडगाव रॉयल्सचा डाव १८ षटकांत १४७ धावांत संपला. गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्टने गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजन केले होते.

विजेत्या व उपविजेत्या संघांव्यतिरिक्त प्रायॉरिटी टायटन्स, काणकोण मठग्राम युनायटेड, लझिज सीक्यूएस, सिंक रेंजर्स यूसी, म्हापसा ड्रीम क्रशर्स, रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज हे संघ या स्पर्धेचा भाग होते.

शनिवारी विद्युतझोतात खेळविण्यात आलेल्या अंतिम लढतीत मेगा स्ट्रायकर्सकडून सिद्धित रायतुरकर याने सर्वाधिक ३८ धावांचे योगदान दिले. २५ चेंडूंचा सामना करताना ३ चौकार व २ षटकारांसह त्याने आपली खेळी सजवली. दुर्गेश प्रभुगावकर (२६) याच्यासह त्याने दुसऱ्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी केली. सलामीवीर विस्मय फळगावकर याने ३५ धावा जमवल्या. यश प्रभुगावकर (१६ चेंडूंत २१) व अमोद बोरकर (१० चेंडूंत नाबाद १६) यांनीदेखील फटकेबाजी केली. मडगाव रॉयल्सकडून शौनित सावर्डेकर व अर्श सरदेसाई यांनी प्रत्येकी २ तर विक्रम गायतोंडेने १ गडी बाद केला.

धावांचा पाठलाग करताना रॉयल्सने ठराविक अंतराने गडी गमावले. विशेषकरून मधल्या फळीत सनत प्रभुदेसाई (१), विक्रम गायतोंडे (९), अर्श सरदेसाई (०) व संप्रभ फळदेसाई (०) यांच्या अपयशामुळे त्यांचा संघ विजयापासून दूर राहिला. तिसऱ्या क्रमांकावरील साहीश महांबरे याने २४ चेंडूंत ४ चौकार व २ षटकारांनिशी ४० धावा चोपल्या. आदित्य दलाल (२९), ग्रांथिक बुयांव (२६) व कौशल हट्टंगडी (२३) यांनी केलेले प्रयत्न अपुरे पडले. मेगा स्ट्रायकर्सकडून अनिमेश प्रभुगावकरने ३, आदित्य आंगलेने २ तर दुर्गेश प्रभुगावकर, अनीश प्रभुदेसाई व आदित्य प्रभुगावकर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. अनिमेश प्रभुगावकर याला मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मानस डेव्हलपर्सचे संस्थापक तन्मय खोलकर, शीर्षक प्रायोजक असलेल्या आल्कॉन एंटरप्रायझेसचे संचालक व सन्माननीय अतिथी आकाश खंवटे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. केतन भाटीकर, कुडचडे–काकोडा नगरपालिकेचे नगरसेवक बाळकृष्ण होडारकर, प्रायॉरिटी कन्स्ट्रक्शन्सचे संचालक दिनेश पै, शामराव बिल्डर्सचे भागीदार प्रथमेश सुखठणकर, गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सिद्धित रायतुरकर, स्पर्धेचे मुख्य संयोजक कपिल सिनाय बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

संक्षिप्त धावफलक

सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – २० षटकांत ७ बाद १७२ (सिद्धित रायतुरकर ३८, विस्मय फळगावकर ३५, दुर्गेश प्रभुगावकर २६, यश प्रभुगावकर २१, अमोद बोरकर नाबाद १६, शौनित सावर्डेकर २०–२, अर्श सरदेसाई २५–२, विक्रम गायतोंडे ३३–१) विजयी वि. मडगाव रॉयल्स – १८ षटकांत सर्वबाद १४७ (साहीश महांबरे ४०, आदित्य दलाल २९, ग्रांथिक बुयांव २६, कौशल हट्टंगडी २३, अनिमेश प्रभुगावकर ३३–३, आदित्य आंगले १४–२, दुर्गेश प्रभुगावकर १६–१, अनीश प्रभुदेसाई १७–१, आदित्य प्रभुगावकर १७–१)

वैयक्तिक बक्षिसे – मॅन ऑफ द मॅच – अनिमेश प्रभुगावकर, हिरो ऑफ द मॅच – आदित्य प्रभुगावकर, स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाज – दामोदर पै पाटणेकर, सर्वोत्तम गोलंदाज – स्मितेश दिवेकर, सर्वोत्तम क्षेत्ररक्षक – सनत म्हापणे, सर्वोत्तम यष्टीरक्षक– विस्मय फळगावकर, स्पर्धावीर – आदित्य दलाल (बक्षीस ॲक्टिवा स्कूटर).

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 187 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .